—: प्रेसनोट :— दिनांक : ०९/०३/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बृहन्मुबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | १३/२०२१ |
| कलम | कलम –७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | गणेश गुलाबराव साळुंके, वय ३८ वर्षे, धंदा– पोलीस शिपाई क्र ०५.०२८५, नेमणूक– मालवणी पोलीस ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १,००,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १,००,०००/– |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे अंबुजवाडी, मालवणी, मालाड (प.) परिसरात गवंडीकाम तसेच छोटे मोठे घर दुरुस्तीचे काम करतात. आरोपीत लोकसेवक यानी तक्रारदार याना बोलावून "तुम्ही ८० रुम अवैद्य बांधल्या आहेत तुमचे व तुमच्या मुलाचे पोलीस ठाण्यात नाव आले असून, तुम्हाला एमपीडीए लागेल" असे सांगून त्या मोबदल्यात तक्रारदार याना १०,००,०००/– रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ५,००,०००/– लाच स्विकारण्याचे कबुल केले. त्यानंतर तक्रारदार यांनी भितीपोटी त्याच्यावर व त्याच्या मुलावर कारवाई न करण्यासाठी आरोपी लोकसेवक याना रु. ३,००,०००/– दिले.<br>उर्वरित रक्कम तक्रारदार याना लोकसेवक यानी दिनांक २०/०३/२०२१ रोजी घेवून येण्याबाबत सांगितले. परंतु तक्रारदार याना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई, वरळी मुंबई येथे दिनांक ०८/०३/२०२१ रोजी लोकसेवका विरुध्द लेखी तक्रार दिली.<br>तक्रारदार यानी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०९/०३/२०२१ रोजीच्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यानी रु. १,००,०००/– लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याप्रमाणे लावण्यात आलेल्या सापळा कारवाईच्या वेळी लोकसेवक गणेश साळुंके याना रुपये १,००,०००/– लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
संकेतस्थळ – acbmaharashtra.gov.in
ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in,(2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन – www.acbmaharashtra.net.
टोलफ्री क्र. १०६४,
दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
व्हॉट्स ॲप क्रमांक – ९९३०९९७७००

(आबासाहेब पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई